# मेट्रोची चाचणी भुयारी मार्गात

म. टा. विशेष प्रतिनिधी

---

दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महत्त्वाची मेट्रो मार्गिका असलेल्या कुलाबा ते सीप्झसाठीच्या मेट्रो रेल्वे डब्यांची चाचणी मरोळ मरोशीतील भुयारी मार्गात करण्यात येणार आहे. या चाचणीमुळे हा मेट्रो प्रकल्प दृष्टिपथात आला आहे. राज्य सरकारने स्थगिती दिलेल्या आरेतील त्या जागेच्या हद्दीबाहेरच ही चाचणी करण्यात येणार असून आरेतील एकाही वृक्षाला धक्का न लागू देता मेट्रोच्या चाचण्या पूर्ण करण्याची सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे.